| MHKO050042312024 | **म.कौ.हि.सं.का.अर्ज नं. ६७/२०२४**<br>**निशाणी क्र. ११ व १४ वर आदेश**<br>**दिपाली रणजित बगाडे**<br>वि.<br>**रणजित वजीर बगाडे आणि इतर** |
|---|---|

१. यातील अर्जदार यांनी प्रस्तुतचे अर्ज हे कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ च्या कलम १८ व २८(२) नुसार संरक्षण आदेश मिळणेसाठी दाखल केलेले आहेत.

२. अर्जदार यांनी वि.प. यांचे विरोधात कौंटुंबीक हिंसाचार प्रतिबंधक कायदा अन्वये कोर्ट मजकूरी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांनी निशाणी ११ च्या अर्जात असे कथन केले आहे की, वि.प. नं. १ हे अर्जदार राहात असलेल्या पत्त्याच्या ठिकाणी जावून शोधाशेध घेत आहेत. तसेच अर्जदार यांच्या नातेवाईकांकडे जावून अर्जदार मिळालेस तिला जिवंत सोडत नाही अशी धमकी देत आहेत. यातील वि.प. नं. १ यांनी यापूर्वीही अर्जदार यांच्यावर जीवघेणा हल्ला केलेला होता. अर्जदार यांच्या कृत्यामुळे अर्जदार हिला दिवसा तसेच रात्री दैनंदीन कामकाजासाठी घराबाहेर पडणे अडचणीचे झाले आहे. अर्जदार हिला मा. कोर्टासमोर हजर राहणे देखील अशक्य झाले आहे. त्यामुळे अर्जदार हिने तीला संरक्षण मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. वि. प. यांनी सदर अर्जास निशाणी ११ चे अर्जास म्हणणे देवून अर्जास विरोध केला आहे. अर्जातील कथने त्यांना मान्य व कबूल नाहीत. अर्जात नमूद केल्याप्रमाणे वि.प. यांनी कोणतेही कृत्य केलेले नाही. निव्वळ वि.प. यांना त्रास देण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वि.प. यांनी अर्जदार यांना केंव्हाही संपर्क करणेचा प्रयत्न केलेला नाही. सबब वि.प. यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदार यांनी निशाणी १४ कडे अर्ज देवून असे कथन केले आहे की, अर्जदार हिचा निशाणी ११ कडील संरक्षणाबाबतचा अर्ज प्रलंबीत असताना अर्जदार ही तारेखेसाठी कोर्ट आवारात आली असता वि.प.नं. १ , अर्जदारची नणंद ललिता तिळंगे व गीता गागडे यांनी अर्जदार यांना ऐकू जाईल अशा आवाजात अर्जदार यांना शिवीगाळ केली तसेच अर्जदार यांच्यकडे रागाने बघत होते. तसेच वि.प. नं. १ हे अर्जदार ज्या रिक्षातून आली होती त्या रिक्षा चालकास अर्जदार कोठे राहते याबाबत विचारत होते. अशा परिस्थीतीत अर्जदार यांना वि.प. व वि.प. यांच्या संबंधीत लोकांपासून धोका आहे. सबब अर्जदार हिले त्याबाबत संरक्षण आदेश मिळणेची विनंती केली आहे. वि.प. यांनी सदर अर्जास म्हणणे देवून अर्जातील सर्व कथने नाकरली आहेत. वि.प. यांचे असे कथन आहे की, वि.प. अथवा त्यांचे नातेवाईक यांनी कोणतेही संभाषण अथवा चौकशी केलेली नाही. तसेच अर्जदार यांना शिवीगाळी केली नाही. अर्जदार यांनी वि.प. यांना त्रास देण्याकरीता अर्ज दाखल केला आहे सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**३.** अर्ज निशाणी ११ व १४ व त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. अर्जदार यांनी मूळ अर्ज कौंटूबीक हिंसाचार कायदा कलम १२, १७, १८, १९, २० व २२ अन्वये दाखल केला आहे. अर्जदारने मूळ अर्जामध्ये कलम १८ प्रमाणे संरक्षण आदेश मिळणेबाबत विनंती केली आहे. अर्जदाराचे यांचे कथनानुसार वि. प. यांनी तीला भांडण तंटा करुन मारहाण केलेली आहे. त्यामुळे अर्जदार हिला जीव वाचविणेकरीता माहे मे २०२४ मध्ये घर सोडून निघून जावे लागलेले आहे. तीने वि. प. यांचे विरोधात मा. अतिरीक्त जिल्हा पोलीस प्रमुख, इचलकरंजी विभाग यांचेकडे दिनांक २९/०५/२०२४ रोजी तक्रार दिलेली आहे. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जामध्ये असे कथन केले आहे की, वि. प. हे अर्जदारचा सध्याचा पत्ता शोधत असून मारणेची धमकी सुध्दा देत आहेत. तसेच प्रस्तुतचे काम प्रलंबीत असताना सुध्दा वि.प. व त्यांचे नातेवाईक हे शिवीगाळ करीत आहेत. अर्जदार हीने सदरचे कथन शपथेवर केले

आहे. त्यामुळे अर्जदारची संरक्षणाबाबतची मागणी ही रास्त वाटते. मूळ अर्जाचा गुणदोषावर निकाल होणेस बराच कालावधी आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार मागणी करीत असल्याला संरक्षण आदेश पारीत करणे न्यायोचित होईल. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

१. अर्ज निशाणी ११ व १४ मंजूर करण्यात येत आहेत.

२. वि.प. यांना असे आदेशित करण्यात येते की, प्रस्तुत कामी पुढील आदेश होईपावतो वि.प. अगर तर्फे इसम यांनी अर्जदार यांना धमकावू, शारीरीक इजा अगर कोणतेही गैरकृत्य करु नये.

३. संबधीत आदेशाची प्रत संरक्षण अधिकारी, हातकणंगले व संबंधीत पोलीस ठाणे यांना पाठवावी.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहिर)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2024.08.31 17:01:25 +0530

**दि. ३०/०८/२०२४** **(संजय दि.वानखेडे)**
**इचलकरंजी** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१, कोर्ट नं.४, इचलकरंजी**